बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

**माहिती कक्ष, दि ०६ नोव्हेंबर २०२३**

# सलगरवस्ती पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | १९०/२०२३ भादवि ३२४,३२३,५०४ प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०५/११/२०२३ रोजी ०८.३० वा चे सुमारास न्यु धोंडिबा वस्ती रामवाडी सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०६/११/२०२३ रोजी १५.०६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | गौसिया मेहताब शेख,वय-४० वर्षे,रा-न्यु धोंडिबा वस्ती रामवाडी सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | मेहताब अब्बास शेख,रा-नई जिंदगी सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि ०५/११/२०२३ रोजी ०८.३० वा चे सुमारास न्यु धोंडिबा वस्ती रामवाडी येथे फिर्यादी हे फिर्यादीचे बहिणीच्या घरी असताना फिर्यादीचे पती मेहताब अब्बास शेख हे घरी आले व फिर्यादीस मालकीन ला घरभाडे किती देणे आहे असे विचारले असता फिर्यादीने आरोपीला माझ्याशी बोलू नका घरमालकीला जावून विचारा असे म्हणाले असता त्या कारणावरून चिडून जावून वरील आरोपीत मजकूर यांनी फिर्यादीस शिवीगाळी करून हाताने लाथाबुक्याने मारहाण केली त्यावेळी फिर्यादीची बहिण आयशा सलमान शेख ही भांडण सोडविण्यास आले असता त्यांना देखील शिवीगाळ करून बाजूला पडलेला फरशीचा तुकडा घेवून फिर्यादीच्या डोक्यात मारून जखमी केले आहे.म्हणून.तपास:- पोह/८०८/कदम-९८५०४९९७५८ |

# विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६२५/२०२३ भादवि ४५४,४५७,३८० प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि ०४/११/२०२३ रोजी पहाटे ०५.०० वा ते दि ०६/११/२०२३ रोजी सकाळी ०७.३० वा चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि ०६/११/२०२३ रोजी १६.०७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | भाग्यलक्ष्मी नागनाथ पिडगुलकर,वय-४२ वर्षे,रा-१९,कल्याणनगर भाग-३सावजी खानावळच्या शेजारी आसरा पुल जुळे सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | ५,१४,२००/- रूपये त्यामध्ये रोख रक्कम,सोन्याचे व चांदिचे दागिने |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,दि ०४/११/२०२३ रोजी पहाटे ०५.०० वा ते दि ०६/११/२०२३ रोजी सकाळी ०७.३० वा चे दरम्यान फिर्यादी हे मुलीच्या लग्नकार्यासाठी लागणारे साहित्य खरेदी करण्यासाठी हैद्राबाद येथे गेले असता फिर्यादीचा भाऊ व भाऊजय यांना घरी ठेवून गेले होते.परंतु दि ०४/११/२०२३ रोजी फिर्यादीचे नातेवाईक मयत झाल्याने फिर्यादीचे भाऊ व भाऊजय हे मयतीसाठी बाळीवेस येथे गेले असता जाताना घराचे मुख्य दरवाज्यास व लोखंडी गेट ला कुलुप लावून गेले होते तरी कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे कुलुप कशाचे तरी साहयाने तोडून घरात प्रवेश करून कपाटात ठेवलेले वरील किंमतीचे सोन्याचे,चांदीचे दागिने व रोख रक्कम हि फिर्यादीच्या संमतीवाचुन मुद्दाम लबाडीने चोरून नेली आहे.म्हणून.तपास:- पोसई/पोपळभट-**८५३०९७३७३१** |